# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१४ – १५

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**



सकाळ
बुधवार, ३ सप्टेंबर २०१४
४

### वक्तृत्व स्पर्धेत ४५ विद्यार्थी

#### राजगुरूनगरला आयोजन; जाधव वैयक्तिक गटात प्रथम

राजगुरुनगर, ता. २ : हुतात्मा राजगुरू यांच्या जयंतीनिमित्त हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रशांत ठाकरे व स्वप्नील इंगोले यांनी सांघिक विजेतेपद मिळविले.

स्पर्धेच्या या रौप्यमहोत्सवी वर्षात २२ महाविद्यालयांतील ४५ स्पर्धक सहभागी झाले होते. वैयक्तिक निकाल पुढीलप्रमाणे : प्रथम- मेघनाथ जाधव (शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर), द्वितीय- अशोक शिंदे (शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पारनेर), तृतीय- काजल बोरस्ते (एचपीटी महाविद्यालय, नाशिक), उत्तेजनार्थ- अय्याज शेख (विद्या प्रतिष्ठान, बारामती), प्रियांका म्हसे (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर).

स्पर्धेचे उद्‌घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते झाले. बक्षीस वितरण राजगुरुनगर बँकेचे अध्यक्ष सतीश नाईकरे पाटील, संस्थेचे संचालक सुशील शिंगवी, बाळासाहेब सांडभोर, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष आनंदराव काळे यांच्या हस्ते झाले. डॉ. बजरंग कोरडे, डॉ. जयराम खाडे, डॉ. धनंजय लोखंडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या वेळी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्या सौ. व्ही. खेडकर उपस्थित होते. डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. स्पर्धा संयोजन समिती प्रमुख डॉ. टी. जी. गिते यांनी आभार मानले.

राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण करताना राजगुरुनगर बँकेचे अध्यक्ष सतीश नाईकरे (डावीकडून तिसरे).

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख